Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

12 January 2019 Special Issue – 92

# महात्मा गांधी यांचे विचार



**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. Galphade A.B.**
Assit. Prof. Heda of Dept.,
Political Science,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. Shinde S.K.**
Assit. Prof. Dept. of Political Science,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

RESEARCH JOURNEY

Visit to - www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATION

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Gandhi And His Ideals : A Source Of Literary Creation | Dr. Umakant D. Padamwar | 7 |
| 2. | गांधीजीचे सत्याग्रह संबधी विचार | प्रा.तेलंगे एन.एन. | 9 |
| 3. | महात्मा गांधीचे विचार व कार्य | प्रा. डॉ. अत्तार अमजद हारुण | 11 |
| 4. | ग्रामविकासासाठी गांधी विचाराची उपयुक्ता | प्रा. डॉ. रजनी अ. बारोळे | 14 |
| 5. | महात्मा गांधीजींचे सत्याग्रहासंबंधी विचार | चौधरी प्रदीप विनायक | 16 |
| 6. | महात्मा गांधीजींचे सत्य आणि अहिंसेसंबंधी विचार | प्रा.डहाळे सचिन राजाभाऊ<br>प्राचार्य डॉ.व्ही.जी. गुंडरे | 19 |
| 7. | गांधीजीच्या विचारांची आजच्या स्थितीत उपयुक्तता | प्रा. डॉ. जगदिश देशमुख | 21 |
| 8. | महात्मा गांधीजींचेसामाजिक विचार | प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 23 |
| 9. | महात्मा गांधी विचारांची प्रस्तुतता | प्रा. डॉ राजेश सुभाष चालीकवार | 25 |
| 10. | महात्मा गांधीजींचे समग्र विचार | डॉ.राम प्र.ताटे<br>डॉ.संभाजी रा. पाटील | 28 |
| 11. | गांधीजींच्या विचारांची सद्यस्थितीत उपयुक्ता | प्रा.डॉ.जे.एस.ढवळे | 30 |
| 12. | हिन्दी साहित्य में गांधी दर्शन | प्रा.डॉ.सय्यद अमर फकिरसाब | 32 |
| 13. | गांधीजींचे शिक्षणविषयक विचार | प्रा.डॉ.बालाजी खराबे | 34 |
| 14. | महात्मा गांधी : धर्म आणि राजकारण | डॉ. शेख फेरोज जफर | 36 |
| 15. | महात्मा गांधीजीच्या विचारांची आजच्या स्थितीत उपयुक्तता व गरज | डॉ. घायाळ एस. पी. | 38 |
| 16. | महात्मा गांधीप्रणित सामाजिक विधयक कार्यक्रम: एक अभ्यास | डॉ.इंगळे चत्रभुज बंकटराव | 40 |
| 17. | महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार | डॉ.लक्ष्मण गिते | 43 |
| 18. | राष्ट्रपिता महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचाराचे परिक्षण | प्रा. डॉ. कांबळे एम.एस. | 45 |
| 19. | म. गांधींजी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामस्वराज्य' विचारातील साधर्म्य | प्रा. डॉ. सुनिता शंकरराव कुरूडे | 48 |
| 20. | महात्मा गांधी प्रणीत अहिंसा : एक जीवनप्रवाह | प्रा.मलदोडे साहेबराव रामराव | 51 |
| 21. | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | प्रा. वाघमारे आर. वाय. | 53 |
| 22. | महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयीचे विचार | प्रा.डॉ.सुखनंदन ढाले | 55 |
| 23. | महात्मा गांधी यांचे राजकिय विचार एक दृष्टी क्षेप | प्रा.डॉ.हारिभाऊ पांडुरंगराव कदम | 58 |
| 24. | महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा.डॉ.टी.बी.पुरी | 60 |
| 25. | महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास | प्रा.जिजाराम श्रीकृष्ण बागल | 63 |
| 26. | महात्मा गांधीजींचा समतेविषयक दृष्टिकोन | प्रा. जोगदंड एम.बी. | 64 |
| 27. | गांधीजीची सत्य आणि अहिंसेची संकल्पना | डॉ. वनमाला गुंडरे | 66 |
| 28. | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक, सामाजिक, विचार - एक अभ्यास | डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख | 68 |
| 29. | महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार | प्रा. ढगे सछिंद कांतीलाल ढगे | 70 |
| 30. | महात्मा गांधीचे आर्थिक विचार | प्रा. दुनघव ए.डी. | 72 |
| 31. | महात्मा गांधीजींच्या राजकीय विचारांचे चिंतन | डॉ.सचिन शिंदे | 74 |
| 32. | म. गांधीजीचे सत्य आणि अहिंसेविषयी विचार | प्रा. सोनवणे उत्तम मोहन | 76 |
| 33. | महात्मा गांधीजीचे सत्याग्रहासंबधीचे विचार | डॉ. श्री. काकासाहेब गंगाधर पोकळे | 79 |
| 34. | महात्मा गांधी यांचे राजकीय विचार | डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके | 82 |
| 35. | महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार | प्रा.डॉ.वानखेडे उमाकांत ज्ञानोबा | 84 |
| 36. | महात्मा गांधीजीचे राजकीय विचार | प्रा.डॉ. बी.एम.नरवाडे | 87 |
| 37. | महात्मा गांधी यांचे आर्थीक विचार | प्रा. डॉ. अनंत नरवडे | 90 |
| 38. | महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. संजय जोगदंड | 94 |
| 39. | महात्मा गांधीजींचे अफ्रिकेतील सामाजिक कार्य, एक अभ्यास | प्रा.गंगणे आर.व्हि. | 96 |
| 40. | गांधी विचार आणि भारतीय लोकशाही | प्रा.संदिप कोरडे | 99 |
| 41. | महात्मा गांधी एक अष्टपैलू व्यक्तिमत्व | प्रा. ज्योती मगर | 101 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार

# गांधीजींच्या विचारांची सद्यस्थितीत उपयुक्ता

प्रा.डॉ.जे.एस.ढवळे
*राज्यशास्त्र विभागप्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,गढी ता.गेवराई जि.बीड.*

---

प्रस्तावना :

महात्मा गांधीजींनी समकालीन परिस्थतीला प्रतिसाद देत असतांना संपूर्ण भारताचा तुलनात्मक अभ्यास करुन भारतीय समाजात असलेल्या समस्या समजून घेण्याबरोबर परकीय शक्तींचा सामना करण्यासाठी विविध साधनांचा वेळ प्रसंगी उपयोग केलेला दिसून येतो. यात सत्य, अहिंसा, सत्यागृह, उपवास, आंदोलने, हिजरत, हडताळ आदी साधनाचा उपयोग केला. या गांधीजीनी वेळ प्रसंगी वापर केलेल्या साधनांना गांधीवादाच्या चष्म्यातून पाहिले. गांधी हे प्लेटो,ॲरिटॉटल, कौटिल्य, मार्क्स इत्यादी प्रमाणे तत्वज्ञानी नसून ते धार्मिक भावनेने प्रेरित झाले होते. गांधी दर्शनामध्ये प्लेटो ॲरिस्टॉटल, मार्क्स, हाब्ज, लॉक, रुशो इत्यादीच्या सिध्दांताप्रमाणे त्यांच्या लिखाणात क्रमबध्द पणा असलेला दिसून येत नाही. महात्मा गांधी यांनी समकालीन परिस्थितीला प्रतीसाद देत असतांना मानवी जीवनापुढे येणाऱ्या महाकाय समस्या सोडवण्यासाठी तत्कालीन परिस्थितीनुरुप आपल्या विचारांची शिदोरी जगाला दिली. म्हणून तत्कालीन विभिन्न परिस्थितीला प्रतिसाद दिल्या गेलेल्या त्यांच्या विचारात काही प्रमाणांत विसंगती दिसत असली तरी गांधीवादाचे महत्व कमी होताना दिसून येत नाही. उलट ते आज जागतिक पटलावर नेल्सन मंडेला, सांग सुकी आदी अनुयायांच्या रुपाने प्रसार होताना दिसून येत आहे. गांधीजीनी केवळ भारतातच कार्य केले नसून त्यांनी आफ्रिका खंडाबरोबर युरो तसेच आशिया खंडात कार्य केले आहे. त्यांच्या विचारांनी संपूर्ण विश्वच भारावून गेल्यामुळे युनोनो 2 आक्टोबर गांधीचा जन्म दिवस जागतिक शातंता दिवस म्हणून साजरा केला आहे. गांधीजीचे जीवन म्हणजे त्यांच्या विचार आणि आदर्शांची अभिव्यक्ती आहे. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांना व जगाला दिलेल्या महान आदर्शपूर्ण संदेशाना त्यांच्या जीवनापासून वेगळे केल्या जाऊ शकत नाही.

असे असले तरी पण सत्य, अहिंसा, शांतता आणि ग्रामीण विकासाचा प्रश्न समोर येतो तेव्हा भारतातच काय जागतिक पटलावर गांधीजीचे चित्र समोर येते. परंतु हे फारसे महत्त्वाचे नसून गांधीना जाणून बुजून समोर आणल्या गेले आहे. गांधीचे तत्वज्ञान हे स्वतःचे नसून मुळात ते गौतम बुध्द याचेच आहे. कारण भारतामध्ये गौतम बुध्द याच्या काळामध्ये शांतते बरोबरच सर्वत्र विकासाचा आलेख चढता राहिलेला दिसून येतो. गौतम बुध्दाच्या विचारामुळे आशियातील चीन, जपान, भुतान, श्रीलंका आदी देशामध्ये गौतम बुध्दांच्या विचारांचा झपाटयाने विस्तार होत गेलेला दिसून येतो. चीन व जपान या राष्ट्राने बुध्दाच्या तत्वज्ञानाचा अवलंब करुन झपाटयाने आपला आर्थिक विकास साधलेला दिसून येतो. परंतू भारतामध्ये बुध्दाच्या तत्वज्ञानाला छेद देऊन महात्मा गांधीच्या विचारांचा स्वीकार केला गेल्याने आज पावेतो भारताचा कोणताच प्रश्न सुटलेला दिसून येत नाही. गौतम बुध्दाच्या व चार्वाकाच्या तत्वज्ञानाला हजारो वर्षाचा इतिहास असतांना त्याच्याकडे मुदामहून दुर्लक्ष केले जात आहे. बुध्दाच्या विचारांची 3500 वर्षा पूर्वी ग्रीकला धसकी भरली असता त्यानी अशोक सम्राटाला पराभूत करण्यासाठी सिकंदरने भारतातवर आक्रमण केले पण त्याला आपले लक्ष साध्य करता आले नाही. त्याचा मानहानीकारक पराभव झाला होता.

**गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता :** 21 व्या शतकाचा जागतिक पटलावरचा धावता आढावा घेतला असता असे दिसून येते की, विकसनशिल व अतिमागास म्हणजे लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशिया या तिसऱ्या दुनियेत डोकावले असता या राष्ट्रामध्ये अंतर्गत बंडाळी बरोबर वाढती गरिबी,बेकारी, कुपोषण, शिक्षण, आरोग्य, अशांतता, भ्रष्टाचार, अकार्यक्षम राजकीय नेते, फुटिरतावादी चळवळीला आलेला उत आदी प्रश्नामुळे सर्वसामान्य जनतेला दैनंदिन जीवन जगणे अशक्य झाले आहे. या तिसऱ्या दुनियेत चाललेले विकसित राष्ट्राच्या उद्योगामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय कार्यात शोषण सर्रास पणे केले जात आहे. पत्रकार, विदेशी राजदुत आणि वत्तपत्रकारावर होणारे हल्ले, स्त्रियांवरील वाढते अत्याचार, सार्वजनिक ठिकाणे, पक्षकार्यालये या ठिकाणी वारंवार होणारे राडे, नागरी जीवनातील वाढता हिंसाचार व खून, धमकावने, वाढती विषमता, जागतिकरणाची खाउजा संकल्पना, सुरक्षा व्यवस्थेच्या अद्ययावतीकरणातून जाणवणारी कमालीची अस्थिरता आणि जागतिक पटलावरील धार्मिक,- वांशिक, जातीय, प्रांतीय अस्मितेचे प्रश्न आदीमुळे तिसऱ्या दुनियेला आपल्या स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे रावयाचे असेल तर त्यांना गांधी तत्वज्ञानाचा आधार घेणे उपयुक्त ठरु शकते. गांधीजीच्या सत्य व अहिंसा बरोबर ग्रामद्योगाची संकल्पना तिसऱ्या दुनियेला तारणारी दिसून येते.

**बहुराष्ट्रीय कंपन्या व गांधी नीती :** जागतिक पटलावर साम्यवादी आणि भांडवलशाही विचारधारेने धुमाकुळ घातल्यामुळे अविकसनशिल राष्ट्रांना मोठया प्रमाणात यांचा फटका बसला आहे. विकसित राष्ट्रांनी तिसऱ्या दुनियेतील राष्ट्रांना देशाधडीला लावण्यासाठी विकासाचे गाजर समोर करुन बहुराष्ट्रीय कंपन्या आपले साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी खुले आर्थिक धोरण म्हणजे खाऊजा ही संकल्पना समोर आणली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या उद्योगामुळे तिसऱ्या दुनियेत विषमता, बेरोजगारी, शोषण आदि समस्या मध्ये वाढ झाल्याने पुन्हा एकदा विकसित राष्ट्राचा आर्थिक साम्राज्यवादमध्ये राष्ट्र खितपट पडलेली आहेत. अशा परिस्थितीत तिसऱ्या दुनियेला तारण्यासाठी गांधीजींच्या ग्रामद्योग संकल्पना निश्चित तारु शकते.

आधुनिक लोकशाही राज्य व गांधीचे ग्रामराज्य : दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक साम्राज्यवादाचा ऱ्हास झाल्यानंतर साम्राज्यवादात वर्षानुवर्ष खितपत पडलेली तिसऱ्या दुनियेतील अनेक राष्ट्रांचा जागतिक पटलावर उदय झाला. या नव्याने उदयास आलेल्या राष्ट्रांनी कोणत्याही लष्करी संघटनेत शामील न होता लोकशाही पध्दतीचा स्वीकार केलेला दिसून येतो. परंतु या राष्ट्रातील नैसर्गिक साधनसंपत्ती

विकसित राष्ट्रांनी लुटण्याबरोबर येथील राष्ट्रांच्या अंतर्गत राजकारणात सातत्याने हस्तक्षेप केलेला दिसून येतो. यामुळे या राष्ट्रात जवळपास लोकशाही रुजलेली दिसून येत नाही. याचे कारण असे की, विकसित राष्ट्रांनी आपल्याला हवे असलेले आणि आपल्या कुबडया घेऊन चालणारे शासनच बहुतेक अविकसनशिल देशात सत्तेवर आणले. यामुळे तेथील जनतेला हवे असलेली लोकशाही आजपावेतो रुजवता आलेली नाही. उदा. अरब राष्ट्र, म्यानमार, मालदिव, पाकिस्तान आदी राष्ट्रामध्ये लोकशाही सरकार सत्तेवर आले असले तरी येथील हुकुमशाही प्रवृत्तीने भारावून गेलेले लष्कर प्रमुखानेच लोकशाहीचा बळी घेतलेला दिसून येतो. या राष्ट्रामध्ये लोकशाहीचे विकेंद्रीकरण होण्याऐवजी दिवसेंदिवस लोकशाहीचे केंद्रीकरणच झालेले होतांना दिसून येत आहे. येथील जनतेचे कोणतेही प्रश्न शासन यंत्रणेने सोडवलेले नाहीत. त्यामुळे आधुनिक लोकशाही राज्यामध्ये अराजकता माजल्यामुळे सर्वसामान्य जीवन जगणे अशक्य झाले आहे. या राष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला आपला श्वास मोकळया वातावरणात घ्यावयाचा असेल तर त्यांना गांधीजीनी प्रतिपादित केलेली ग्रामस्वराज्य संकल्पना अस्तित्वात आणने काळाची गरज बनली आहे.

**सारांश :**

तिसऱ्या दुनियेतील राष्ट्रांना आपला सर्वांगिण विकास साधावयाचा असेल तर या राष्ट्रांना गांधीवादाचे तत्वज्ञान अंगिकारणे आवश्यक असले तरी सद्यःस्थितीत या राष्ट्रांचे प्रश्न सुटू शकणार नाहीत हे दिसून येत आहे. भारत ही गांधीवादाची भूमी असून 65 ते 70 वर्षापासून भारतावर गांधीवादाचे गारुड घोंगावत असले तरी गांधीवादाला अपेक्षीत असलेली समाजरचना किंवा शासन व्यवस्था अस्तित्वात येवू शकली नाही. भारतातच काय जगातील अनेक राष्ट्रांना स्वतःचा सर्वांगिण विकास करावयाचा असेल तर त्यांना गौतम बुध्द व चार्वाक्याच्या तत्वाज्ञानाशिवाय पर्याय नाही हे काळया दगडावरची रेष आहे. कारण असे की, चीनची अनेक परकीय शक्तीनी लचके तोड केली असता त्याचबरोबर जपानवर अमेरिकेने टाकलेल्या अणुबॉबमुळे जपानचा कोळसा झाला असतांना चीन व जपान राष्ट्रांनी गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानाचा स्विकार करुन जागतिक आर्थिक महासत्ता बनवल्या आहेत. हे नाकारता येत नाही. भारतात लोकशाही असली तरी भारताला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागलेले दिसून येत आहे. भारतामध्ये लोकसंख्या संख्यात्मक वाढलेली आहे. पण यात गुणात्मक प्रमाण असलेले दिसून येत नाही. समकालीन परिस्थितीमध्ये भारताला गांधी तत्वज्ञानाची नाही तर गौतम बुध्द आणि चार्वाक तत्वज्ञानाची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

1. संपादक पंजाबराव चव्हाण, मूल्यव्यवस्था गांधी विचार, निर्मल प्रकाशन, नांदेड.
2. जगन फडणीस, महात्म्याची अखेर, प्रकाशन सुनिल मेहता, सदाशिव पेठ, पुणे.
3. श्रीपाद केळकर, अेकला चलो रे, प्रकाशन गोपाळ मोकाशी, साशिव पेठ, पुणे.
4. माधन गडकरी, शेवटचे गांधी, कोहिनूर प्रकाशन, मुंबई.
5. नारायण भाई देसाई, अचंबित करणाऱ्या बापूकथा, समकालीन प्रकाशन, सुरत गुजरात.

----------------